मंगळवार, १६ डिसेंबर २०१४ प्रहार





जेष्ठ कवी विष्णु वाघ यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य पाटील

# कविता जगण्याला नवी प्रेरणा देते : विष्णू वाघ

## दोडामार्ग महाविद्यालयात रंगली काव्य मैफल

▶ दोडामार्ग *(प्रतिनिधी)*

कविता ही आपल्या अवती भवतीच, प्रत्येक गोष्टीत असते पण ती टिपता आली पाहिजे, तशी नजर आपल्याकडे असायला हवी तरच आपण कविता लिहू शकतो. कविता जगण्याला एक नवी प्रेरणा मिळते. निसर्गाकडे कवीच्या नजरेने पाहिले पाहिजे,असे गोमंतकातील सुप्रसिद्ध कवी व आमदार विष्णू सूर्या वाघ यांनी सांगितले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्ग मधील मराठी भाषा व वाड्.मय मंडळातर्फे काव्य मैफिलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्या प्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यात मराठी साहित्याविषयी आवड निर्माण व्हावी या हेतूने महाविद्यालयातील माठी भाषा व वाड्.मय मंडळातर्फे वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमप्रसंगी जेष्ठ कवी वाघ यांच्यासमवेत तालुका उत्कर्ष समितीचे अध्यक्ष विवेक नाईक, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य सूर्यकांत परमेकर, सुचन कोरगांवकर, ॲड. प्रविण नाईक, प्रेमप्रकाश नाईक, जेष्ठ लेखक चंद्रकांत गावस आदी उपस्थित होते.

कवितेविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी मराठी, कोकणी व मालवणी काव्य मैफल या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी व कवी म्हणून बोलताना ते पुढे म्हणाले, कविता ही आपल्या जगण्यातून आली पाहिजे. निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीत कविता असते. आपल्या अवतीभवती ती वावरत असते, फक्त तिला पहायला शिकले पाहिजे. सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेतलं तरच कविता होऊ शकते. कविता ही माणसाला जगायला शिकविते, ती जगण्याला अर्थ देते. कवितेतील शब्द कधी हसवतात, रडवतात, कधी अंतमूर्ख करतात. यावेळी त्यांनी आपल्या शैलीत विविध कविता सादर करताना उपस्थितांना खळखळून हसायला लावले तर काही कवितांनी रडायला लावले.

प्रिंटीग प्रेसवाला व भाजीवाला हे आपल्याकडील उपलब्ध साहित्याचा वापर करून प्रेमावर कविता कशी करतील. माझं काळीज प्रिंटीग मशीन, तु माझी इंपोर्टेड शाई, छापायला गेलो तुझं नाव - पण जाई, प्रुफ रिडर झोपला अन् छापून आलं ताई तसेच वटवृक्षाची जशी सावली, तशीच असते आई, आई म्हणजे अपार डोंगर मेहनत अन् कष्टांचा ही वरची कविता ऐकून सारेच भावूक झाले. या कार्यक्रमास उपस्थितांनी भरभरून दाद दिली.